# कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व लॉकडाऊनमुळे भारतासमोर निर्माण झालेले आव्हान

प्रा. डॉ. कैलास मोटे
एसएसजेपी एम.एड. कॉलेज, आळणी उस्मानाबाद

प्रस्तावना :

भारताची वाटचालही सार्वभौम राजकीय, आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, आरोग्य व सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत होणाऱ्या बदलाच्यामुळे आज जगाच्या नकाशावर भारतीय संस्कृती ही एक आदर्श संस्कृती व एक आदर्श जीवनपध्दती म्हणून भारतीय समाजाकडे पाहिले जाते. भारताने स्वातंत्र्य प्राप्ती नंतर अनेक समस्यांना मागे टाकले आहे जसे की, बालमृत्यूच्या दरात लक्षणीय घट झाली आहे, तसेच कुपोषणाचे प्रमाणही कमी झाले आहे. ग्रामीण आरोग्य सुविधेतही काही प्रमाणात बदल झाला आह. पण हवा तेवढा बदल झालेला नाही. त्यामुळे आकस्मीत निर्माण होणाऱ्या समस्यांना आज आपण प्रभावी सामोरे जाऊ शकत नाहीत. आज ज्या गंभीर घटनेमुळे तर्कनिष्ठ, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक समतोल, आरोग्य विषयक सुविधा व आर्थिक परिस्थिती याचा विचार करण्याची वेळ आपल्यावर आली आहे. २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम व संतुलीत समाज निर्माण करणे गरजेच आहे. येणाऱ्या काळात भारताला अनेक आव्हाणांना सामोरे जावे लागणार आहे. जसे की आज कोरोनाच्या रूपाने आपल्या समोर नवे आव्हाण 'आ' वासून उभा आहे. एवढेच नव्हेतर भारता समोर निर्माण होऊ शकणारी आव्हाणे म्हणजे आर्थिक मंदी, दहशतवाद, परकीय आक्रमणाची शक्यता, महागाई, भूक बळी, जातियता, राजकिय अस्थैर्य यामुळे भारतात बिकट परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. आज आपण ज्या परिस्थितीतून जात आहोत ती परिस्थिती आव्हाणात्मक आहे. ही लादलेली महामारी, लादलेले आव्हाण आपणासमोर आहे. हे जागतीक जैविक महायुध्द असण्याची शक्यता तज्ज्ञाकडून व्यक्त केली जात आहे. याचे परिणाम म्हणून येणाऱ्या काळात युध्दासारख्या परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे. असे अनेक प्रसंग जगासमोर या पूर्वीही निर्माण झाली होती त्याचे परिणाम सर्व जगाने भोगले आहेत.

भौगोलिक मर्यादेत राहून कोणत्याही राष्ट्राला अलिप्तपणे सुखी व संपन्न जीवन जगणे शक्य नसते. अशा प्रकारचे आंतरराष्ट्रीय संबंध प्राचीन काळापासून अस्तित्वात असले तरी विसाव्या शतकात या संबंधाना जागतिक राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय सामर्थ्याच्या अधिष्ठानावर जागतिक राजकारणात आपले स्थान निश्चित करीत असते. भौगोलिक परिस्थिती लोकसंख्या नैसर्गिक साधनसामग्री औद्योगिक व शास्त्रीय प्रगती, लष्करी सुसज्जता राष्ट्रीय मनोधैर्य, स्थिर राज्यव्यवस्था व जीवन विषयक तत्वज्ञान इ. गोष्टीवर राष्ट्रीय सामर्थ्य अवलंबून असते.

आधुनिक यंत्रयुगात प्रचंड कारखाने व उत्पादन यांचा अवलंब केल्याखेरीज कोणत्याही राष्ट्राला सामर्थ्य संपन्न होता येत नाही. सुसज्ज प्रयोगशाळा अलौकिक बुध्दीचे शास्त्रज्ञ, उत्कृष्ट शिक्षणव्यवस्था व सिध्द झालेल्या प्रयोगांचा व्यापारी उपयोग करण्याची तयारी इ. गोष्टी राष्ट्राचे आंरराष्ट्रीय संबंधातील स्थान ठरविण्याला कारणीभूत ठरतात. विशेषत: प्रचंड कारखाण्यांसाठी लागणारा कच्चा माल व उत्पादन केलेल्या मालासाठी बाजारपेठा आंतरराष्ट्रीय संबंधात संघर्ष निर्माण करण्याला कारणीभूत होतात. लष्करी सुसज्जता संहारक शस्त्रांचा शोध, सैन्यांची ताकद, व युध्दविशारद सैन्याधिकारी इत्यादींची राष्ट्रसामर्थ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. ही राष्ट्र इतर राष्ट्रावर वर्चस्व गाजवण्यासाठी कोणत्याही स्थराला जाऊ शकतात हे कोरोना विषाणूच्या जगभरात

पसरलेल्या हाहा कारावरून लक्षात येते आहे. आता हे जगानेही या परिस्थितीला ओळखले आहे.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी अमेरिका व जपान ही राष्ट्रे व यूरोपातील जर्मनी व इटली ही राष्ट्रे बलवान झाल्यामुळे यूरोपच्या परंपरागत राजकारणास धक्के बसू लागले व त्यातूनच पहिले महायुध्द झाले. पुढे दुसरे महायुध्द झाले आणि या दुसऱ्या महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय संबंधाच्या क्षेत्रात भांडवलशाही व साम्यवादी असे दोन परस्परविरोधी सत्तागट निर्माण झाले. लष्करी अगर राजकीय सहकार्य आर्थिक मदत व वैचारिक प्रचार इ. सर्व मार्गांनी आपल्या गटात दुसऱ्या राष्ट्राला ओढण्याचा प्रयत्न सर्वत्र सारखा चालू होता. अशा प्रकारच्या अव्याहत प्रचारामुळे व कृतीमुळे आंतरराष्ट्रीय संबंधात शीतयुध्दाला सुरूवात झाली आहे. नव्हे ते अप्रत्यक्ष आज चालू आहे असे आपणास आजच्या परिस्थितीवरून म्हणावे लागत आहे..

भांडवलशाही व साम्यवादी हया दोन्ही सत्ता गटांपासून अलिप्त राहणारी भारत, स्वीडन, स्वित्झर्लंड इ. अलिप्ततावादी राष्ट्रे जगात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करतांना दिसतात. लष्करी दृष्टया हया देशांना महत्त्व नसले तरी आंतरराष्ट्रीय संबंधात अलिप्त राष्ट्रांना महत्त्वाचे स्थान आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संदर्भात विसाव्या शतकात पुष्कळच सुधारणा झाली आहे. आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी नवे मार्ग अवलंबले जात आहेत. केवळ आंतरराष्ट्रीय परिषदावर सर्व प्रश्न न सोपविता काही महत्त्वाच्या प्रश्नांसाठी राष्ट्रप्रमुखांच्या बैठका घेण्याचा मार्गही हल्ली अवलंबिण्यात येतो आहे. एवढे असूनही आज जागतीक स्तरावर मतभेद दिसून येत आहेत. अमेरिका –चीन, भारत–पाकिस्तान, भारत–चीन, चीन– जर्मनी, द. कोरिया – उत्तर कोरिया, उत्तर कोरिया– अमेरिका, अमेरिका– इराक, इ. अनेक सत्ता संघर्ष केंद्रे जगात आहेत यामुळे जगात अशांतता निर्माण आहे. कोरोनाचे प्रकरण हे यातूनच निर्माण झालेले असावे असा अंदाज वर्तविला जात आहे. आर्थिक, तंत्रज्ञान व राजकिय वर्चस्वासाठी महासत्ता बनन्याच्या महत्त्वकांक्षेतून हे जैविक युध्द आहे चालू झाले आहे असेच आपणाला म्हणावे लागेल.

जागतीक सत्ता संघर्ष चालू असतांनाच डिसेंबर २०१९ ला चीनमध्ये कोरोना नावाच्या विषाणूजन्य साथीच्या रोगाचा प्रसार झाला. हे कसे झाले कोणत्या परिस्थितीमुळे झाले याचा विचार करणारे प्रश्न मनामध्ये निर्माण होतात. जगात महासत्ता बनण्याची स्पर्धा चालू होती. या महासत्तेच्या स्पर्धामध्ये काही देश उतरले आहेत. या स्पर्धामध्ये उतरणाऱ्या देशाचे विस्तारवादी धोरण आजच्या परिस्थितीला कारणीभूत आहे. या महासत्तेच्या स्पर्धेत सत्ता संघर्षही निर्माण झाला आहे. जागतिक स्तरावरील नेतृत्व हे आपल्या हाती असावे असे चीन, अमेरिका व रशिया या देशांना विशषेत्वाने वाटत आहे. याला सर्वात मोठे कारण आहे ते म्हणजे चीनचे विस्तारवादी धोरण. अन्विक युध्दापेक्षा जैविक युध्द हे सर्वात घातक आहे. या गोष्टीचा विचार काही देशांनी केला होता कारण अन्विक युध्दामुळे आपल्याही देशाची मोठी हाणी होऊ शकते या गोष्टीचा विचार करता व ते होणालाही परवडणारे नाही या गोष्टीच्या विचारातून जैविक युध्दाचे नवे तंत्र विकशीत झाले असल्याचे काही तज्ज्ञांचे मत आहे. यातूनच या कोरोना विषाणूसारख्या जैविक युध्दाची सुरूवात आज संपूर्ण जगात सुरूवात झाली आहे असे तज्ज्ञांचे मत आहे. या जैविक युध्दाने आज काही देश संपूर्ण उध्दवस्त आले असल्याचे आपणाला दिसत आहे. यावर असेच म्हणावे लागेल की जग कोरोना नावाच्या विषाणूने तयार केलेल्या पिंजऱ्यात बंद आहे. आजवर विज्ञानवादी राष्ट्रांनी अनेक वायरसला आपल्या प्रयोग शाळेतील चंचूपात्रात बंद केले होते. आज याच व्हायरसने जगाला बंद केले आहे. आज जगातील बहुतांश राष्ट्र एक महिन्या पेक्षा अधिक कालावधीसाठी बंद आहेत. याचे उदाहरण भारत देशच आहे. भारतामध्ये दोन टप्यातील लॉकडाऊनचा कालावधी विचारात घेतला तर तब्बल ४० दिवसाचा लॉकडाऊन पुकारण्यात आला आहे. या कालावधीत नागरिकांना घराच्या बाहेर पडता येणार नाही. यासाठी

इंग्रज काळात अस्तीत्वात आलेला साथीचे रोग प्रतिबंधक कायदा अधिनियम १८९७ हा अंमलात आला आहे. यामुळे भारतातील संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. यामुळे जगाबरोबरच भारला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

साथीचे रोग प्रतिबंधक कायदा :

जानेवरी २०२० मध्ये भारतात कोरोना विषाणूचा पहिला रूग्ण केरळमध्ये आढळला. ज्या प्रमाणात शासनाने प्रकरण हाताळणे अपेक्षित होते. त्या प्रमाणात हाताळले गेले आहे किंवा नाही याचा विचार करणे महत्वाचे नसून आज आपण या प्रकरणावर कशी मात करतो ते महत्वाचे आहे. देशात वाढता कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेता भारत सरकारने राज्य सरकारांच्या मदतीने २२ मार्च २०२० रोजी एक दिवसाचा जनता कर्फ्यूचा वापर केला आणि दिनांक २३ मार्च पासून २१ दिवसाचा मोठा लॉकडाऊन जाहिर केला. यामुळे देशातील सर्व समाज एका पिंजऱ्यात अडकला गेला. कारण ही तसेच आहे. कोरोनाच्या आजारावर कोणतीही लस किंवा औषध उपलब्ध नाही. हा लॉकडाऊन साथरोग प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत पुकारण्यात आला होता. मार्च २०२० पासून भारतातील अनेक राज्यांनी केंद्राने पुकारलेला जनता कर्फ्यु राज्यातील कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी साथीचे आजार कायदा १८९७ अंमलात आणला. देशाला किंवा राज्याला किंवा दोघातील एखादया भागाला कोणत्याही धोकादायक साथीचा आजाराचा किंवा या आजाराची साथ पसरण्याचा धोका आहे किंवा ती साथ पसरू लागली आहे आणि अस्तित्वात असलेल्या कायदद्याच्या सामान्य तरतुदी हा प्रसार रोखण्यासाठी पुरेशा नाहीत असे केंद्र किंवा राज्य सरकारला खात्री पूर्वक वाटत असेल तर ते जनतेवर किंवा एखाद्या व्यक्तीला देऊशकते अशा आजाराच्या प्रसाराला प्रतिबंध करणे आवश्यक वाटल्यास सरकार हे पाऊल उचलू शकते तसेच यासाठी येणारा खर्च कोणत्या पध्दतीने तसेच कोणी सोसायचा हेही सरकार निश्चित करू शकते.

यापुढे जाऊन असे की, रेल्वे किंवा अन्य मार्गाने प्रवास करणाऱ्या व्यक्तीची तपासणी करण्यासाठी नियम घालून देण्याचे व उपाय करण्याचे, तसेच या एखाद्या व्यक्तीला या आजाराचा प्रादुर्भाव झाल्याचा संशय तपासणी अधिकाऱ्याला आल्यास त्या व्यक्तीला रूग्णालयात तात्पुरत्या रहिवासात किंवा अन्य पध्दतीने इतरांपासून विभक्त ठेवण्याचे अधिकारही हा कायदा सरकारला देतो. या कायद्याखाली करण्यात आलेल्या नियमाचा किंवा देण्यात आलेल्या आदेशाचा भंग केल्यास तो दंडनिय गुन्हा ठरवण्याची तरतूदही या कायद्यात आहे अखेरचा मुद्दा म्हणजे या कायद्याखाली कारवाई करणाऱ्या व्यक्तीला किंवा अधिकाऱ्याला हा कायदा संरक्षण पुरवतो या कायदयाखाली चांगल्या हेतूने केलेल्या कोणत्याही कारवाईसाठी या व्यक्तीवर खटला भरला जाऊ शकत नाही किंवा कोणतीही कारवाई केली जाऊ शकत नाही.

वसाहतवादी कालखंडात तयार झालेल्या या कायद्याची प्रसंगोचितता कायदेशीर वैधता व पावित्र्य या बददल तज्ज्ञांमध्ये वाद रंगला असताना हा कायदा कोणत्या ऐतिहासिक संदर्भात आणला गेला.वास्तविक वसाहतवादाची आरोग्यविषयक धोरणे म्हणजे भारतीय शरीरे खऱ्या अर्थाने वसाहतवादी करण्याचा डाव होता. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस वसाहतवादी सत्ताधाऱ्यांनी अंगिकारलेल्या प्लेगविरोधी उपायामधून हे स्पष्ट दिसून येते. प्लेगविरोधी मोहिम ही प्लेगच्या तूविरोधात होती त्याहून अधिक स्थानिकांच्या विरोधात होती असे मत एका अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. फेब्रुवारी १८९७ मध्ये प्लेग साथीच्या पार्श्वभूमीवर संमत करण्यात आलेल्या साथीचे आज कायद्याचे वसाहतवादी सरकारला अनिर्बंध अधिकार मिळाले होते. हा कायदा विशेषत: मुंबई इलाख्यात राबवला गेला गव्हर्नर जनरल इंडिया यांच्या कौन्सिलमध्ये धोकादायक साथीच्या आजारांचा अधिक चांगला प्रतिबंध करण्यासाठी हा कायदा मांडण्यात येत आहे असे कौन्सिलचे सदस्य जॉन वूडबर्न यांनी नमूद केले या कायदद्याव्दारे सरकारला दिले जाणारे अधिकार

आजारांचा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक आहेत. आणि अशा गंभीर व महत्त्वाच्या परिस्थितीत लोकांनी सरकारच्या विवेकबुध्दीवर विश्वास टाकला पाहिजे यावर त्यांनी भर दिला. या कायदयाने वसाहतवादी सरकारला प्लेगचे संशयीत ताब्यात घेण्याचा प्रादुर्भाव झालेली मालमत्ता व घरे नष्ट किंवा उदध्वस्त करण्याचा, जत्रा व यात्रांना मनाई करण्याचा व प्रवाशांची तपासणी करण्याचा अधिकार मिळाला.

हाच कायदा आज संपूर्ण भारत देशामध्ये लागू करण्यात आला आहे. भारतामध्ये संघराज्य शासन पध्दती आहे या संघराज्य शासन पध्दतीमध्ये दोन शासन प्रणाली आहेत एक म्हणजे राज्य शासन दुसरे म्हणजे केंद्र शासन या शासन यंत्रणेमध्ये जेव्हा एखादा कायदयाची अंमलबजावणी संपूर्ण देशात करायची असते तेव्हा राज्यामध्ये जर शासन केंद्र सरकार विरोधी पक्षाचे असेल तर ते केंद्राचे कायदे मानायला तयार होत नाही. याच्या पाठीमागील कारण म्हणजे राजकीय व्देश होय हया व्देशामुळे भारतीय समाजव्यवस्था व अर्थ व्यवस्थेचेही मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. आज संपूर्ण देशामध्ये कोरोना या विषाणूजन्य आजाराने थैमान घातले आहे याचा फटका भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला बसला आहे यामुळे सामाजिक व आर्थिक लोकजीवनावर याचा खूप मोठा परिणाम झाला आहे. भारतात ही याचा खूप मोठा परिणाम झालेला आहे.

आज भारतामध्ये ४० दिवसापेक्षा अधिक कालावधी लॉकडाऊनचा उलटला आहे. सर्व कंपन्या, दैनंदिन व्यवहार बंद आहेत. याचा सर्व स्थराला फटका बसलेला आहे. यामुळे भारतासमोर सद्या व येणाऱ्या काळामध्ये खूप मोठया प्रमाणावरील अव्हाणे व समस्या आ आसून समोर उभ्या आहेत. ही आव्हाने किंवा समस्या कोणती ती पाहणे उचित ठरेल.

भारतासमोर निर्माण झालेले आव्हान :

<u>आर्थिक आव्हान</u>:

कोरोना विषाणूजन्य आजाराने चीनमध्ये सुरूवात झाली खरी परंतू याचा संपूर्ण जगाला या आजाराने ग्रासले आहे. याचा फटका संपूर्ण जगाच्या आर्थव्यवस्थेला बसला आहे. आज जगातील संपूर्ण उदयोग धंदे बंद आहेत. दैनंदिन व्यवहार बंद करून देशातील लोकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रीत केले आहे. 'देशातील जनता वाचली पाहिजे' याला प्राधान्य प्रत्येक देशात देण्यात येत आहे. जगातील बहुसंख्य देशाचे अर्थकारण फक्त आरोग्य व्यवस्थेच्या भोवती फीरत आहे. हाच परीणाम भारतावरही झाला आहे.भारतात ३० दिवसा पेक्षा अधिक कालावधी लॉकडाऊनचा झाला आहेया कालावधीमध्ये संपूर्ण देशातील कंपन्या, मॉल, हॉटेल, लघुउदयोग, व्यापार, ट्रान्सपोर्ट इ. बंद आहेत. चलन बंद आहे. आयात निर्यात बंद आहे. त्यामुळे अर्थव्यवस्था स्थिर आहे. असेही आपणाला म्हणता येणार नाही. अर्थव्यवस्थेची गती मंदावली असून तीची वाटचाल ऋणात्मकतेकडे चालू आहे. विकासावर होणार खर्च हा विकासावर न होता संपूर्ण खर्च जीवनावश्यक बाबीवर खर्च होतांना दिसत आहे. एवढेच नव्हेतर या जीवनावश्यक बाबींच्या उत्पादनावर ही कोरोना विषाणूचा परिणाम झाला आहे. उत्पादन बंद असल्याने जो माल उपलब्ध आहे तो माल व्यापारी चढया भावाने विकू लागले आहेत त्यामुळे महागाईत वाढझाली आहे.

भारताची अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमयाच्या दरात मोजल्यास जगातील १२ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. भारताचे वार्षिक सकल उत्पन्न १०८९ अब्ज एवढे आहे. २००७ नुसार क्रयशक्तीच्या समानतेचा निष्कर्ष लावला तर भारताच्या अर्थव्यवस्थेचा जगात तिसरा क्रमांक लागतो. जगातील सर्वात वेगात वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थेमध्ये भारताचा चीनपाठोपाठ दुसरा क्रमांक आहे. भारताचा आर्थिक विकास दर २००६—०७ मध्ये आर्थीक वर्षात ९.४ टक्के एवढा होता. मात्र अतिशय मोठया लोकसंख्येमुळे भारताचे वार्षिक दरडोई उत्पन्न मात्र ९६१ डॉलर एवढेच आहे. क्रयशक्तीचा विचार करता वार्षिक दरडोई उत्पन्न ४१८२ डॉलर एवढे आहे. भारतीय अर्थ व्यवस्था ही शेती, हस्तव्यवसाय, कापडगिरण्या, उदयोगधंदे,

उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यात होतो. भारतात काम करणाऱ्या लोकांपैकी २/३ ( दोन त्रित्याअंश) लोक हे शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. देशाच्या अर्थिक विकासात मात्र कृषी उत्पन्नाचा वाटा हा अत्याल्प आहे. त्यामुळे याचा अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. भारतीय शेती हंगामावर व हवामानावर आधारीत असल्याने अर्थ व्यवस्थेतील कृषी विकासाचा दर अत्याल्प आहे.

जागतीक बॅकेच्या २०१८ च्या क्रमवारीत भारतीय अर्थव्यवस्था सहाव्या क्रमांकावरून घसरून सातव्या क्रमांकावर आली आहे. २०१७ च्या क्रमवारीत भारतीय अर्थव्यवस्थेचे आकारमान २.५६ ट्रिलियन डॉलर्स होते. यामध्ये २०१८ मध्ये वाढ होऊन हा आवडा २.७३ ट्रिलियन डॉलर्स झाला. पण क्रमवारीत मात्र भारताची घसरण झाली आहे. या घसरणीचे कारण म्हणजे २०१८ मध्ये फ्रान्स आणि ब्रिटनची अर्थव्यवस्था भारतीय अर्थव्यवस्थेच्या तुलनेत अधिक सक्षम स्थितीत राहिल असे वाटत होते, पण ते शक्य झाले नाही. अमेरिकेची अर्थव्यवस्था २०१८ मध्ये २०.४९ ट्रिलियन डॉलर्ससह पहिल्या क्रमांकावर आहे तर १३.६१ डॉलर्ससह चीनची अर्थव्यवस्था दुसऱ्या क्रमांकावर आहे.जपानची अर्थव्यवस्था ४.९७ ट्रिलियन डॉलर्स ने तिसऱ्या क्रमांकावर आहे.

देशाचा २०१९–२० चा आर्थिक विकासदर ५ टक्के एवढा आहे. तो २०२०–२१ ला ६ ते ६.५ टक्के राहिल असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. २०२४–२५ पर्यंत देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहचवण्यासाठी भारताला या कालावधीत पायाभूत सुविधावर १.४ ट्रिलियन डॉलर खर्च करण्याची आवश्यकता आहे. पण हे होतांना दिसत नाही. भारताच्या विकासाचा दर २०१९ पासून मंदावलेला आहे. याचे कारण म्हणजे कमी होणारे उत्पन्न व हाताबाहेर जाणारी महागाई हयामुळे भारताच्या आर्थिक परिस्थितीवर ताण आला आहे. युरोपातील आर्थिक पडझडीमुळे भारतात गुंतवणूक करणारे परदेशी गुंतवणूकदार वेगाने गुंतवणूक कमी करीत आहेत. हयामुळे रूपयावर ताण येऊन तो खाली जात आहे. आजच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी आपल्याला किती कोटी लोक दारिद्रय रेषेच्याखाली किंवा जवळपास आहेत. याच्या पलिकडे जाऊन विचार करण्याची गरज आहे. समाजातील लोकांच्या मुलभूत मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी असलेली असमर्थता मग ती गरज रोगराई व भूकेपासून दूर असणारे निरोगी आयुष्य जगण्याची असो किंवा सामाजिक दृष्टया मान्य असलेले रहाणीमान मिळवणे त्यासाठी आवश्यक असलेली संसाधने प्राप्त करणे आणि त्यासाठी शिक्षण घेण्याची संधी असो एका अंदाजानुसार सार्स महामारीच्या वेळी जागतीक अर्थव्यवस्थेचे खूप मोठे नुकसान झाले होते. ते म्हणजे ४० अरब डॉलरचे नुकसान सहन करावे लागले होते. यात भारतालाही आर्थिक मंदीला सामोरे जावे लागले होते. असाच परिणाम आज या कोरोना विषाणूच्या आजाराने भारतीय अर्थव्यवस्थेवर होतांना दिसत आहे. देशातील सर्व घटकावर होणारा खर्च आज अन्न आणि औषध घटकावरच होतांना दिसत आहे. तसेच आयात व निर्यात बंद आहे. देशातील सर्व उद्योगधंदे बंद आहेत.यामुळे असंघटीत कामगारावर उपासमारिची वेळ आली आहे.

भारतीय रिझर्व्ह बॅकेने म्हटले आहे की, कोरोना या संसर्गाच्या आजाराचा परिणाम देशाला भविष्यकाळात ही होणार आहे. कोरोना या संसर्गाच्या आजाराचा जागतिक उत्पादन पुरवठा व्यापार आणि पर्यटनावर येणाऱ्या भविष्यकाळात विपरीत परिणाम होणार आहे असे भारतीय रिझाव्हे बॅकेने आपल्या चलनविषयक धोरण अहवालात नमूद केले आहे. आरबीआयच्या म्हणण्यानुसार कोरोना विषाणूच्या उद्रेकाचा परिणाम थेट महागाईवर होणार आहे. पुरवठयातील अडचणीमुळे अन्नपदार्थाच्या किंमती घसरतील आणि बिगर खाद्यपदार्थाच्या किंमती वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

<u>उदयोगधंदे विषयक</u>:

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान यांनी पहिल्या टप्प्यात २१ दिवसाचा लॉकडाऊन

जाहिर केला होता. तर दूसऱ्या टप्पात २० दिवसाचा लॉकडाऊन जाहिर केला आहे. लॉकडाऊन उठल्यानंतर सर्वच उद्योगांना आर्थिक संकटातून जावे लागणार आहे. विविध कंपन्यांना कर्मचारी आणणे व कच्चामाल उपलब्ध करून पक्या मालाला पुन्हा बाजारपेठ मिळविणे आदी बाबी प्राप्त करण्याचे मोठे आव्हाण उद्योगजकांना पेलावे लागणार आहे. आर्थिक संकटामुळे अनेक कंपन्या बंद पडून अनेक कर्मचाऱ्यांना रोजगार गमवावा लागेल अशी भिती व्यक्त केली जात आहे. यामुळे कंपन्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. उत्पादन करून ते बाजारपेठेत पोहचविण्यासह विक्री होण्यासाठी किमान दोन ते तीन महिने लागतील. सध्या सर्वच कंपन्याचे हे चक्र थांबले आहे. सर्वच उद्योजकांना रूटीनमध्ये येण्यास दोन ते तीन महिने लागतील लॉकडाऊनची झळ किमान दोन वर्षापर्यंत सुरू राहील असे तज्ज्ञांचे मत आहे.

कंपन्या सुरू झाल्यावर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीचा प्रश्न निर्माण होईल अनेक प्रश्न सोडवितांना कर्मचाऱ्यासंदर्भातही तारेवरची कसरत करावी लागेल. त्यात शासनाने तीन महिने कंपन्यांकडून कर्जवसूली करू नये असे आदेश बॅंकांना दिले आहेत. त्यामुळे बॅंकांची आर्थिक परिस्थितीही नाजूक रहाणार आहे.

बीबीसी न्यूजने आपल्या १३ मार्च २०२० मध्ये असे स्पष्ट केले आहे की, चीन मध्ये उत्पन्नावर होणारा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतांना दिसत आहे. यामध्ये करीब ३४.८ करोड डॉलर चे नुकसान होत आहे. ओईसीडी ने २०२०–२१ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाची गती १.१ प्रतिशतने घटू शकते असे म्हटले आहे. चीन ही जगातील सर्वात मोठी दोन नंबरची अर्थव्यवस्था असलेला देश आहे. चीनमध्ये आणिबाणी ची परिस्थिती निर्माण झाल्याने बाजार पेठांनी आपला मोठा ग्राहक गमावला आहे चीनला तेलाचा साठा मोठा लागतो पण संचार बंदीने वाहतूक बंद झाली आहे. त्यामुळे चीनच्याही उद्योग धंदयांना ब्रेक लागला आहे.

भारताचा अर्थव्यवस्थेतील तेल, नैसर्गिक वायू, वीज या मुख्य मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात आताच मंदीचे वातावरण आहे २०१९ च्या सालाच्या शेवटच्या दोन तिमाहित या क्षेत्राची वाढ ऋणात्मक आहे. त्यात कोरोनाच्या तडाख्याने अर्थव्यवस्थेवर किती गंभीर परिणाम होतील याची कल्पना करणे अवघड आहे. गेल्या वर्षीच्या म्हणजे २०१९–२० चा जीडीपी दर पहिल्या व तिसऱ्या तिमाहित सहावर्षाच्या निचांकी पातळीवर पोहोचला आहे. लॉकडाऊनमुळे हा परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

पर्यटण उद्योग विषयक:

कोरोना व्हायरचा परिणाम भारतीय पर्यटन उद्योगावर होत आहे. बाहेरच्या देशातील/ विदेशातील पर्यटक बंद झाल्याने विदेशी चलन भारतात येणे बंद झाले आहे. येणाऱ्या तीन महिण्यामध्ये भारतामध्ये येणारे व्यापारी तसेच बाहेरून येणाऱ्या लोकांची संख्या कमी झाल्याने व्यापारी उद्योगावर ३० ते ३५ टक्के परिणाम होऊ शकतो लॉकडाऊनचा कालावधी वाढलातर हा परिणाम १०० टक्के होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम हॉटेल व्यवसाय लघुउद्योग यांच्यावरही होणार आहे. सद्या हॉटेल व्यवसाय १०० टक्के बंद आहे. जगाच्या पर्यटन विभागावर तब्बल २५ ते ३० अरब डॉलरचा परिणाम होऊ शकतो. कोरोनाचा प्रादूर्भाव वाढतच गेला तर हा परिणाम या पेक्षा अधिक वाढत जाणार आहे. विमान उद्योगाला कोरोना विषाणूच्या जागतीक महामारीमुळे ६५ ते ७० अरब डॉलरचे नुकसान होऊ शकते. सद्या देशांतर्गत व विदेशातील १०० टक्के विमान उड्डाने बंद आहेत. याचा मोठा फटका विमान उद्योगांना बसत आहे. कामगारांच्या वेतनावर व विमानाच्या देखभालीवर मोठा खर्च होत आहे. याचा परिणाम कंपन्यांच्या व शासनाच्या तिजोरीवर होत आहे. तसेच या क्षेत्राशी संबंधित लहान मोठया उद्योगावरही याचा परिणाम होत आहे व तो येणाऱ्या काळात ही होणार आहे. या सर्व गोष्टीचा फटका असंघटीत कर्मचाऱ्यांना मोठया प्रामणात बसणार आहे.

आॅटोमोबाईल उद्योग:

भारताच्या आॅटोमोबाईल उद्योगात कमीत कमी ३.७ करोड लोक काम करत आहेत. याचा फटका भारतीय आॅटोमोबाईल उद्योगावर होणार आहे. सन २०१९ पासूनच या उद्योगाला घरघर लागली आहे. मागणी कमी झाल्याने या उद्योगावर या पूर्वीच मोठे संकट आले आहे. एवढेच नव्हे तर नोटबंदीचा फटकाही या उद्योगाला मोठया प्रमाणावर झाला आहे. खेळते चलन बंद झाल्याने व आर्थिक व्यवहारावर निर्बंध आल्याने या व्यवसायावर २५ ते ३० टक्के परीणाम झाला होता. आता या कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर हा परिणाम १०० टक्के झाला आहे. असे म्हटले तर वावगे होणार नाही. कारण सर्वच लहान मोठे उद्योग १०० टक्के बंद आहेत. उत्पादन तसेच खरेदी, विक्री बंद असल्याने या क्षेत्रातील आर्थिक व्यवहार पूर्ण बंद झाले आहेत. यामुळे कंपन्यांना मोठा फटका सहन करावा लागत आहे. या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांवर उपासमारिची वेळ आली आहे. कपंन्यामध्ये अगोदरच मंदी असल्याने कंपन्यांनी कामगार कमी केले आहेत. आतातर या परिस्थितीचा विचार करता कपन्यांचे उत्पादन बंद असल्याने कंपन्या येणाऱ्या काळात कामगारांची संख्या कमी करू शकते. एक दिड महिन्यात कंपन्यांचे उत्पान चालू झाले तरी कंपन्याचा माल बाजारात येण्यास तीन चार महिने लागतील त्या मालाची विक्री होणे आणि कंपन्यांना पैसा मिळणे याला एक वर्षाचा कालावधीलागेल. कंपन्या कामगारांना बसून पैसा देणार नाहीत. त्यासाठी कंपन्या कामगार कमी करण्याची शक्यतातकिंवा कामगारांचे वेतन ३० ते ४० टक्के कमी करू शकतात. यामुळे कामगारांवर उपासमारीची वेळ येऊ शकते. या सर्व गोष्टीचा फटका देशाच्या जीडीपीवर ही झाल्या शिवाय राहणार नाही. एवढेच नव्हे तरयामुळे देशात महागाई वाढू शकते. याचा परिणाम देशाच्या विकासावर शंभर टक्के होणार आहे.

ज्वेलरी उद्योग:

भारत हा जगातील सर्वात जास्त सोने आयात करणारा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. मार्च २०२० मध्ये भारतात फक्त २५ टन सोने आयात केले आहे. मागील वर्षाच्यामार्च महिण्यातील आयातीच्या ९३.२४ टक्के कमी आहे.लॉकडाऊनमुळे ज्वेलरी उद्योगावर अंदाजे दोन ते तीन अरब डॉलरचे नुकसान सहन करावे लागत आहे. भारतातील हिऱ्याच्या निर्यातीचे सर्वात मोठे केंद्र चीन आहे. त्यानंतर हॉन्गकॉन्ग आहे. या दोन्ही ठिकाणचा व्यापार कोरोना व्हायरसमुळे बंद आहे. त्याच बरोबर भारतात ही या कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव खूप पसरला असून याचा परिणाम हिरे उद्योगावर होत आहे. सर्व देशाच्या आंतरराष्ट्रीय सिमा बंद असल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यापारही बंद झाल्याने आयात बंद झाली आहे. तसेच देशाचा अंतर्गत व्यापारही बंद असल्याने व्यापार उद्योग अडचणीत आला आहे. भारत आफ्रीका व यूरोपीय देशातून सोन्याची आयात मोठया प्रमाणावर करतो जागतीक मंदीमुळे या अगोदरच सोन्याचे भाव गगणाला भिडले होते. आता सोन्याची आयात कमी झाल्याने आणखी सोन्याचे दर वाढल्याशिवाय राहणार नाहीत. याचा सर्वात मोठा फटका मध्यम व गरिब वर्गाला सहन करावा लागणार आहे. एवढेच नव्हे तर या उद्योगात काम करणाऱ्या लाखो कामगारावर उपासमारिचे संकट आले आहे. खेळत्या पैशाच्या अभावाने बाजारात आलेला स्थूलपणा त्यातून वाढलेली बेरोजगारी बँकांनी दिलेली कर्जाऊ रक्कम परत न करता आल्यामुळे बँकांचे निघालेले दिवाळे शेअर मार्केटमधील घसरण जीडीपीची सातत्याने होणारी घसरण यामुळे भारतीय अर्थव्यवस्था दुष्टचक्रात सापडली आहे. लोकांच्या हातात काम नाही. पैसा नाही बॅंक बचत नाही. नेमक्या या परिस्थितीत कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे हतबलता वाढत चालली आहे. या समस्यांचा विचार केल्यास येणारा काळ भारतीय अर्थव्यवस्थेचा बिकटकाळ आहे. जीवनावश्यक वस्तूची मागणी वाढल्याने व साठा कमी असल्याने येत्या काळात याचे भाव वाढल्याशिवाय राहणार नाहीत. यातच काळा बाजार होण्याची शक्यताही नाकारता येणार नाही. लघू उद्योग, शेतकरी, मजूर वर्ग, लघुव्यावसायिक

यांच्यासाठी येणारा काळ आव्हानाचा राहिल खास करून ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बेरोजगारीमुळे जास्त प्रभावित होईल. कोरोना विषाणू विरोधात लढणे सर्व मानव जातीसाठीच निर्णायक ठरणार आहे.

असंघटीत कामगार व बेरोजगाराचे आव्हान:

आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या अहवालानुसार कोरोना विषाणू संक्रमणामुळे भारतात करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे देशातील असंघटित क्षेत्रातील काम करणाऱ्या सुमारे ४० कोटी कामगारापुढे रोजगार गमावण्याची भिती आहे.हे कामगार अधिकच गरिब होण्याची शक्यता इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनने व्यक्त केली आहे. जगातील १९ कोटी ५० लाख लोकांच्या पूर्णकालिक नोकऱ्या जाऊ शकतात असे संघटनेने म्हटले आहे. दुसऱ्या महायुध्दानंतरचे सर्वात मोठे संकट या कोरोना विषाणूमुळे निर्माण झाले आहे. संघटनेचे अध्यक्ष गाय रायडर यांच्या मते कारोना विषाणूमुळे विकसित व विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था पूर्ण उध्वस्त होत आहेत. जगात २ अब्ज लोकसंख्या असंघटित क्षेत्रात काम करते यातील सर्वात मोठी संख्या भारतात आहे. लॉकडाऊनमुळे स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे. यूरोपात काम करणारे लोक हे मोठया प्रमाणावरील भारतातील आहेत. येथील उद्योग बंद पडले तर भारतीय अर्थव्यवस्थेवर खूप मोठा परिणाम होणार आहे. नव्हे कारोनामुळे यूरोपातील बहुतांश उद्योग बंद पडले आहेत. यामूळे कामगार बेरोजगार झाले आहेत. यूरोपातून येणारी परकीय गंगाजळी यामुळे बंद झाली आहे. बाहेरून येणारे परकीय चलन बंद झाल्याने याचा परिणाम देशांतर्गत व्यापार तसेच आयात निर्यातीचे मूल्य याच्यावरही झाल्याशिवाय राहणार नाही.

भारतातील बेरोजगारीचा प्रश्न भारतात करण्यात आलेल्या नोटबंदी पासून सुरू झाला आहे. खेळत्या भांडवलाचे प्रमाण कमी झाल्याने लघुउद्योगावर याचा परिणाम झाला आहे. याचा परिणाम असा झाला की भारतातील बेरोजगारी ४० ते ४५ टक्के एवढी वाढली आहे. त्यात या कोरोनाच्या काळातील लॉकडाऊनमुळे बेरोजगारीच्या प्रमाणात ५५ते ६०टक्के पर्यंत वाढ होऊ शकते. ग्रामीण रोजगारातील वाढ तर नगन्यच दिसते. लॉकडाऊनचा परिणाम रोजगार व उत्पन्न यांच्यावर पहिला आघात होणार आहे. यामुळे सरकारला असंघटतीत क्षेत्रातील दैनंदिन रोजगार मिळवणारा व स्वयंरोजगार मिळवणाऱ्या वर्गाला उत्पन्नाची हमी दयावी लागणार आहे. सद्याचे तंत्रज्ञान पाहता अशी मदत देता येऊ शकते. याचा विचार शासनाने करणे आवश्यक आहे. यात सर्वातमोठा उपाय कोणता असेल तर प्रक्रिया उद्योगाला चालना देणे सर्वात महत्त्वाचे आहे. हे जेव्हा होईल तेव्हाच अर्थव्यवस्थेला मंदिच्या काळात हातभार लागू शकतो.

कोरोनाचे गंभीर परिणाम पाहता आतापासूनच अमेरिकन, ब्रिटन आपल्या देशातील नागरिकांच्या उत्पन्नाची तजवीज करण्यासाठी आर्थिक पॅकेज जाहिर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले आहेत. भारतात अजून तसे प्रयत्न केले नाहीत. पंतप्रधानांनी केलेली १५ हजार कोटींची घोषणाही आरोग्य व्यवस्थेसंदर्भात होती. भारताची अर्थव्यवस्थाही असंघटीत कामगारावर अवलंबून आहे असे आपणास म्हणता येईल. सुमारे ९५ टक्के कर्मचारी वर्ग हा असंघटित क्षेत्रात काम करतो तर सुमारे ५० टक्के हून अधिक वर्ग हा स्वयंरोजगारात काम करतो कोरोनामुळे अर्थव्यवस्थेचे जे चक्र सुस्तावले आहे किंवा त्याची गती कमालिची कमी होईल असा अंदाज आहे. त्याचा सर्वात मोठा फटका हा असंघटित अशा वर्गाला बसणार आहे आणि तो त्यातून पूर्णपणे भरडून निघेल या वर्गाकडे स्वत:ची अशी बचत नसणे त्याचे पैसे गुंतलेले नसतात त्यांच्या बॅंक ठेवीही नसतात.

नोट बंदीच्या वेळीही असंघटीत कामगारांनाच जास्त फटका बसला होता. या घटनेनेच ४५ टक्के एवढी बेरोजगारांची वाढझाली होती. ४० वर्षातील सर्वात मोठी वस्तूच्या मागणीतील घट होती. भारतात संघटित व असंघटित क्षेत्रातील छोटया उद्योजकांकडे मोठया प्रमाणावर कामगार कर्मचारी काम करत असतात ही परिस्थिती पाहता या उद्योजकांनी

आपल्या कामगाराला कामावरून काढूनये यासाठी लघुउद्योजकांचे तीन ते चार महिण्याचे व्याज कमी केल्यास उद्योजकांच्या हाती पैसा राहिल.व असंघटीत कामगारांना रोजगार मिळण्यास मदत होईल.यासाठी शासनाने प्रभावी निर्णय घेणे आवश्यक आहे. तेव्हा कोठे अर्थव्यवस्थेला गती देण्याच्या दृष्टीने लघुद्योजक व असंगटीत क्षेत्रातील कामगार काम करतील.

<u>कृषी उद्योगासमोरिल आव्हान</u>:

कोरोना विषाणूने जगभरात थैमान घातले आहे. शेती आणि शेतकरी हा या लॉकडाऊनच्या जाळयात आडकलेला आहे. देशातील शेती आणि शेतकऱ्यांची स्थिती पाहिली तर शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या वातावरणातील बदल, वेळी–अवेळी पडणारा पाऊस आणि बाजारातील होणारी चढउतार यामुळे शेतकरी परेशान झाला आहे. राज्यातील साखर उद्योग अडचणीत आहे. या आजारामुळे साखरेची निर्यात जवळपास २० मार्चपासून बंद आहे. लॉकडाऊनमुळे आंतरराष्ट्रीय बाजारत ही राज्यातील साखर निर्यातीला बंदी आहे. सदया ९० टन साखर पडून आहे या लॉकडाऊनमुळे फळे, भाजीपाला पिकविणारे शेतकरी अडचणीत आहेत. ग्राहकवर्ग लॉकमध्ये असल्याने ग्राहक वर्ग नाही. यातच व्यापारीवर्ग पडया भावाने माल मागत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतामध्ये केलेला खर्च ही निघेना झाला आहे. हाताशी आलेले पीक टाकूण देण्याची वेळ शेतकरी वर्गावर आली आहे.

शेतातील कामासाठी मजूरवर्ग मिळत नाही. यामुळे शेतकऱ्याचे पीक काढणीला येऊनही मजूर न मिळाल्याने पीकांचे मोठया प्रमाणावर नुकसान होते आहे. वाहतूक बंद आहे. त्यामुळे भाजीपाला व फळे जाग्यावर सडली जात आहेत. नाशवंत वस्तू वेळेत बाजारत गेल्या नाही तर शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे. लॉकडाऊनमुळे ग्राहकवर्ग घरामध्ये अडकून पडल्याने मालाला ग्राहक नाही. ज्या काही वस्तू किंवा माल व्यापारी वर्ग खरेदी करत आहे. तो पडयाभावाने त्याची मागणी होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यासमोर दुसरे उत्पन्नाचे साधन नसल्याने व जो काही पैसा जवळ होता त्याची शेतात गुंतवणूक केल्याने शेतकरी रस्त्यावर आला आहे. चलनाची आवक होत नसल्याने बॅंक व सावकाराचे काढलेले कर्ज भरणे शेतकऱ्यासमोर आव्हाण आहे. यातच कुटुंबाचे पालण पोषण, मुलांचे शिक्षण आरोग्य इत्याची बाबीवर होणारा खर्च हा मोठा आहे. अर्थ प्राप्तीही वजावटीवर व खर्च भरमसाठ यामुळे शेतकरी डोक्याला हात लाऊन बसला आहे.

बाजारात कांदयाची खरेदी काही प्रमाणात होत आहे. परंतू निर्यात बंद असल्याने कांदयाला भाव नाही नव्हे व्यापारी कांदा शेतकऱ्याडून खरेदी करत आहेत पण व्यापाऱ्याकडील कांदा जेव्हा विकला जाईल तेव्हा पैसा मिळेल असे शेतकऱ्यांना सांगत आहेत. या काळात काही नुकसान झाले तर ते नुकसानीचा वाटा काही प्रमाणात शेतकऱ्याने उचलावा असे काही व्यापारी शेतकऱ्यासमोर अट घालून कांदा खरेदी करत आहेत.

मार्केटमधील ४० टक्के कांदा हॉटेल व्यवसायाला जातो आहे. पण लॉकडाउऊमुळे हॉटेलच बंद आहेत. त्यामुळे कांदा जाग्यावर पडून आहे. कोरोनाचा वाढता प्रसार लक्षात घेता शेती शेतकरी आणि अन्न धान्य उत्पादन याची स्थिती पाहता येणाऱ्या काळात जागतिक स्तरावर अन्न धान्य टंचाई निर्माण होण्याचा धोका संयुक्त राष्ट्र अन्न आणि सुरक्षा प्रमुखांनी व्यक्त केले आहे.

शेतातील कामाला शानाने सूट दिली असली तरी पिकणारा माल घेणारा ग्राहक वर्ग नाही त्यामुळे मालाला भाव नसेल मागणी आणि पुरवठयात तफावत असेल तर शेतकऱ्याने जगायचे कसे हा प्रश्न मोठा आहे. कोरोना विषाणूच्या आजारामुळे लॉकडाऊन घेण्यापूर्वी भारतीय अर्थव्यवस्था अन्न धान्याच्या किंमती लक्षणीय वाढ अनुभवत होती. खरे तर २०१९ च्या मध्यापासून अन्न धान्य महागाईस सुरूवात झाली होती. जानेवारी २०२० पर्यत हा दर वाढतच गेला २७ मार्च २०२० च्या रिझर्व्ह बॅंकेच्या ७ व्या दूसऱ्यामासिक चलन

विषयक धोरणानुसार महागाईच्या संदर्भात जानेवारी आणि फेब्रुवारी २०२० मध्ये असे दिसून येते की, तिमाहिचे वास्तविक निकाल अंदाजे ३०bps पेक्षा जास्त आहे हे कांद्याच्या वाढलेल्या किंमतीची झळदर्शविते. कोरोनाच्या आजारामुळे एकूण मागणीत घट झाल्याने अन्न धान्य चलनवाडीचा दबाव कमी होईल असे आरबीआयचे मूल्यांकन आहे. २०१९–२० मध्ये भारतीय अन्न धान्याचे उत्पादन २९२ दशलक्ष टन होण्याचा अंदाज आहे तो मागील वर्षापेक्षा २.४ टक्के ने वाढणार आहे असा अंदाज वर्तवण्यात आला होता. तो जवळपास खरा आहे. प्रथम शेती स्तरावर पीक कापणी व त्याची विक्री देशभर संकटात आहे. कारण असे की,

१. सरकारी संस्थाकडून धान्य खरेदीत निर्माण झालेला अडथळा.
२. खासगी व्यापाऱ्यांनी शेतातून पीके काढून बाजारात आणण्यातील अडथळे.
३. रब्बीच्या पिकांसाठी कामगारांची कमतरता. व वाहतूक क्षेत्रात वाहनचालकांची कमतरता.
४. मुख्य महामार्ग ओलांडून कृषी मालाच्या वाहतूकीस नाकेबंदी.
५. कृषी उत्पन्न बाजार समितीचे चालू बंदचे धोरण.
६. किरकोळ कृषी बाजार ठप्प असणे या घटनामुळे गहू, द्राक्षे, ज्वारी, तांदूळ, टरबूज, केळी, चणा, कापूस, मिरची, हळद, आद्रक, जीरे , भाजीपाला इ. अशा पिकांची खरेदी विक्री करणाऱ्या समोर पेच प्रसंग निर्माण झाला आहे.

कृषी उत्पन्नाच्या किंमती एकदम कमी झाल्या आहेत. पीक काढण्यासाठी लागणारे यंत्र बंद असल्याने पीक शेतातच वाया जाऊ लागले आहे, मशिन दूरस्तीची दूकाने बंद आहेत. पेट्रोल मिळत नाही, टायरमध्ये हवा भरता येत नाही. अशा अनेक समस्या शेतकऱ्यांसमोर आहेत. दूधावर प्रक्रिया करणारे प्लॅन्टस्, कोल्ड स्टोरेज युनिटस आणि गोदामामध्येही कामगारांची कमतरता जाणवत आहे. देशातील अनेक वस्तू पुरवठा साखळया विस्कळीत झाल्या आहेत. पशुधन आहारातील कमतता आणि उपलब्धता बऱ्याच पशुसंवर्धन घटकांमध्ये उत्पादन खर्च वाढीव आहे. शेतीला जोड व्यवसाय म्हणजे शेळी, मेंढी व कुकुट पालन होय. हा व्यवसाय लॉकडाऊन व अफवामुळे बंद पडू लागला आहे. याचा सर्वात मोठा फटका पोल्ट्री व्यावसायाला बसला आहे. बहुतांश व्यावसायिकांनी कोंबडया व पिल्ले जीवंत जमिनीत गाढली आहेत. यामुळे मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांना व व्यावसायिकांना नुकसान सहन करावे लागले आहे. या गोष्टीचा विचार करून पोल्ट्रीचा समावेश जीवनावश्यक गोष्टीमध्ये केला गेला असून ही परिस्थीती सुधारण्यासाठी केलेला हा प्रयोग आहे. शेतकरी घाबरून जाऊन अत्यंत कमी किंमतीत शेळी व कोंबडयांची विक्री करीत आहेत. याचा फायदा व्यपारी घेत आहेत. अशा एक ना अनेक समस्या शेतकऱ्या समोर निर्माण झाल्या आहेत. भारताची अर्थ व्यवस्था ही कृषी आधारीत अर्थ व्यवस्था आहे. यासाठी शासनाने कृषी आधारित अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी शेतकऱ्यांना अल्प दरात कर्ज उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तसेच प्रक्रिया उदयोग सुरू करावेत. असे केले तर अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी याची मदत होईल.

<u>वाहतूक व्यवस्थेसमोरील आव्हान :</u>

२२ मार्च पासून रस्ते वाहतूक, हवाई वाहतूक व जल वाहतूक बंद आहे. भारतातील सर्वात जास्त प्रवास हा रेल्वेने होतो. रेल्वे प्रवास बंद असल्याने रेल्वेचे अब्जावधी रूपयांचे नुकसान होत आहे. रेल्वे बंद असल्याने या परिसरात छोटे उद्योग करणाऱ्या अनेक व्यवसायिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे, नव्हे त्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. मुंबईची जीवन वाहिनी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या रेल्वेने कधी थांबा घेतला नव्हता. मुंबईत रेल्वे चालू झाल्यापासून रेल्वेने एवढे दिवस कधी थांबा घेतला नसेल, इतिहासात नोंद होईल अशी परिस्थिती मुंबई रेल्वेची झाली आहे. करोडो रूपये कमवून देणारी रेल्वे बंद पडल्याने शासनाचे तसेच रेल्वेचे खूप मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. रेल्वे बंद झाल्याने देशातील रेल्वे स्थानकावर

कामकरणारे हमाल, टॅक्षीवाले, अॅटोरिक्षा चालकांचे हाल होत आहेत. या लोकांच्या दैनंदिन रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. नव्हे उपासमारिची वेळ आली आहे. रस्ते वाहतूक बंद असल्याने रिक्षा, टॅक्शी, बस इत्यादी व्यवसाय करणारे व वाहतूक मंडळे यांच्या समोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर उपजिविका करणाऱ्या लोकांसमोर जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. वाहन खरेदीसाठी ज्यांनी बॅंकेचे कर्ज घेतले आहे त्यांची अवस्था खूप बीकट झाली आहे. उत्पन्न नसल्याने बॅंकेचे कर्ज भरणे त्यांना अवघड झाले आहे. जल वाहतूकीला ही मोठया प्रमाणावर परिणाम झाला आहे. खाजगी तसेच शासकीय जल वाहतूकीला पर्यटक नसल्याने तसेच आयात व निर्यात बंद असल्याने याचा मोठा तोटा जल वाहतूकीला बसला आहे. हवाई वाहतूकीवर या कोरोना विषाणूचा खूप मोठा परीणाम झाला आहे. खरे पाहता कोरोना विषाणूचा प्रसार बाहेरच्या देशातून भारतात येणाऱ्या पर्यटक, व्यापारी यांच्याव्दारेच या रोगाचा फैलाव झाला आहे. या गोष्टीचा विचार करूनच शासनाने भारताच्या आंतरराष्ट्रीय सिमा बंद केल्या आहेत. देशाबाहेरील सर्व विमान उड्डाने बंद केली आहेत. कोरोना विषासणूचा प्रसार मोठया प्रमाणावर होऊ लागल्याने शासनाने देशांतर्गत विमान उड्डानेही बंद केली आहेत. बाहेरच्या देशातून भारतात येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. भारताला यातून करोडो रूपयाचे परकीय चलन मिळत आहे. भारताच्या अर्थ व्यवस्थेला याचा मोठा हातभार होता. एकूणच सर्व स्तरातील वाहतूक व्यवस्थेला लगाम लागल्याने देशाच्या चलन वृध्दीचा दर ऋणात्मक झाला आहे. यातच मेंटनन्सचा (देखभाल) प्रश्न व कामगारांच्या उपजीविकेचा प्रश्न मोठा निर्माण होण्याची शक्यता आहे.

बॅंका समोरिल आव्हान :

भारतातील अर्थकारण, समाजकारण व राजकारण हे शेती व शेतीवर आधारित व्यावसायावर आधारित आहे. शेतीव्यवसाय अडचणीत असल्याने तसेच इतर क्षेत्रात ही सध्या कोरोना विषाणूमुळे मंदीचे सावट असल्याने बॅंका अडचणीत आल्या आहेत. सरकारी, सहकारी तसेच पथसंस्था अडचणीत आल्या आहेत. अगोदरच मोठ मोठया उद्योजकांनी बॅंकांचे कर्ज बुडवल्याने बॅंका दिवाळखोरीत निघू लागल्या आहेत. यातच आपत्ती व्यवस्थापन, त्याचबरोबर कर्ज माफी, शासनाचे चूकीचे अर्थविषयक धोरण यामुळे बॅंका समोर मोठे अव्हान तयार झाले आहे. त्यातच कोरोना विषाणूच्या आजाराने जागतीक स्तरावर थैमान घातल्याने बॅंकांची परिस्थिती खराब झाली आहे.

भारताचे बॅंकींग क्षेत्र कोरोनाचा प्रादूर्भाव होण्याअगोदरच मोठया प्रमाणातील अनुत्पादित कर्ज आणि नवीन कर्जासाठीची घटलेली मागणी हया दुहेरी संकटामुळे खिळखिळी झालेली आहे. आर्थिक व्यवहार मंदावले की, बहुतेक सर्व कर्ज परतफेडी ठप्प होतात. त्यातच दिर्घकाळ लॉकडाऊन झाल्यामुळे बॅंकिंग क्षेत्रावरही निश्चितच संकट उद्भवू लागले आहे. उद्योगधंदे बंद असल्याने उद्योजक कर्ज भरू शकत नाहीत. उत्पादन केलेला माल लॉकडाऊमुळे विकता येत नाही. त्यामुळे उद्योजकाकडे पैसा नाही असे बहुतांश उद्योजकांचे म्हणणे आहे जो पैसा होता तो कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च झाल्याने बॅंकांचे कर्ज भरण्यासाठी पैसे नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच आयात निर्यातही बंद असल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. बॅंकाकडे पैसा नसल्याने याचा फटका ठेवीदारवरही होण्याची शक्यता आहे. बॅंकांचा पैसा कर्जदाराकडे अडकल्याणे बॅंका ठेवीदारांना त्यांच्या रक्कमा वेळेत परत करू शकणार नाहीत. कर्ज वसूली होत नसल्याने बॅंकावर याचा परिणाम होऊन मोठा ताण येत आहे. एवढेच नाही तर ठेवीवरील व्याजदरात कपात होऊ शकते. तसेच ठेवीदारला त्यांची रक्कम वेळेत मिळणार नाही आणि जी रक्कम आहे ती एकाच वेळी मिळू शकणार नाही ती टप्याटप्याने ठेवीदाराला दिली जाऊ शकते. अशा अडचणी निर्माण झाल्यास याचा फटका मध्यम वर्गावर होण्याची शक्यता आहे. पै पै करून जमाकेलेली पुंजी लग्न समारंभ, मुलांचे शिक्षण, आरोग्य, नवीन व्यावसाय सुरू करण्यासाठी इत्यादीसाठी ठेवलेल्या ठेवीवर संकट आले तर

मध्यमवर्गातील लोकांच्या आशा आकांक्षावर पाणी पडल्याशिवाय राहणार नाही.

बॅंकांची परिस्थिती सुधारण्यासाठी लघुउद्योग, प्रक्रियाउद्योग व कृषी इ. वर पडणाराभार शासनाने काही प्रमाणात उचलला तर बॅंकाची कार्यपध्दती सुरळीत चालू शकते यासाठी बॅंकाही प्रयत्न करत आहेत. आरबीआयने दिनांक १८/०४/२०२० रोजी असे जाहिर केले की,०.२५ टक्के रिव्हर्स रेपोदरात कपात करण्यात येणार आहे आणि पुनर्रवित्तपुरवठयाची सोयही करण्यात येणार आहे. तसेच असेही स्पष्ट केले आहे की, लघु व मध्यम उद्योगांची परिस्थिती सद्या खराब आहे. यासाठी काही ठोस पावले उचलावी लागणार आहेत. असे आरबीआयने स्पष्ट केले आहे. एक एका गोष्टीवर विशेष अभ्यासपूर्ण लक्ष केंद्री करून अर्थव्यवस्थेला गती देणे आवश्यक आहे.

स्त्रीयांवरील वाढते अत्याचार :

कोरोना विषाणू साथीचा वाढता प्रादुर्भावामुळे देशातील सर्वच जनता एका पिंजऱ्यात अडकली गेली आहे. रोज कामामध्ये दिवसभर व्यस्त असणारा पुरूष लॉकडाऊनच्या काळात चार भिंतीच्या आत अडकूण पडला आहे. यामुळे काम नसल्याने व आर्थिक टंचाईमुळे वैफल्यावस्था मध्यम वर्गीय व गरिब लोकामध्ये निर्माण झाली असल्याणे घरातील स्त्रीयांवर हा राग व्यक्त केला जात आहे. लॉकडाऊनमुळे जगातील सर्वच देशातील स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराच्या प्रमाणात वाढझाली आहे. सर्वच घरात असल्याने छोटया मोठया गोष्टीवरून स्त्रीया बरोबर मतभेद होऊ लागले आहेत.

भारतात या लॉकडाऊनच्या काळात सर्वात जास्त तक्रारी उत्तर प्रदेशात घडल्या आहेत. यासाठी पोलिसांना महिलासाठी हेल्पलाईन सुरू केली आहे. शाळा व नोकरी व्यवसाय तसेच उद्योग बंद पडल्याने घरामध्ये पुरूष बसून राहिले आहेत. त्यांच्या सततच्या कुरबुरी व त्रास महिलांना होत आहे. याच गोष्टीचा विचार करून महाराष्ट्र शासनानेही १०० हा टोलफ्री नंबर महिलासाठी उपलब्ध करून दिला आहे. या नंबर व्दारे महिलांना आपल्या तक्रारी नोंदवता येऊ शकतात. या तक्रारीचा असा विपर्यास काही ठिकाणीतर झाला आहे की, कुटूंबातील सदस्यांमध्ये कायमचे वितूस्ट निर्माण झाले आहे. याचा परिणाम येणाऱ्या पिढीवर झाल्याशिवाय रहाणार नाही.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखा शर्मांनी या गोष्टी मान्य केल्या आहेत. पुरूषांना रोजगार काम नसल्याने वैफल्य आल्याने ते घरातल्या महिलांवर त्याचा राग काढतात. पंजाब राज्याच्या दोन नंबरला तक्रारी आहेत. या राज्यात तक्रारीचे प्रमाण अधिक आहे. सद्या महिलांवर मुले, पती व वृध्दांच्या जबाबदारी पडली आहे. यामुळे महिलांमध्ये चिड चिड वाढली आहे यामुळे कुटूंबातील ताण तणाव वाढले आहेत. शासन यंत्रणे समोर निर्माणझालेले हे नव्हे आव्हान आहे.

शहरी ग्रामीण संघर्ष :

कोरोना विषाणूच्या आजाराने देशात बहुसंख्य शहरी भागातील लोकांचेलोंढे ग्रामीण भागाकडे मोठया प्रमाणावर फिरले आहेत. शहरी भागात कोरोना आजाराचे प्रमाण वाढल्याने शहरातील लोकांनी ग्रामीण भागाकडे पळ काढला आहे. यामुळे शहरातून येणाऱ्या लोकांना गावात प्रवेश दिला जात नाही. प्रवेश रोखण्यासाठी गावाच्या वेशीवरील रस्त्ये बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे शहरी व ग्रामीण असा संघर्ष निर्माण झाला आहे. यापूर्वी ग्रामीण भागातही काही साथीचे रोग मोठया प्रमाणावर पसरत होते. आजही पसरत आहेत. त्यावेळी उपचारासाठी ग्रामीण भागातील लोक शहराकडे आपले नातेवाईकडे जात त्यावेळी याच शहरी भागातील लोकांनी ग्रामीण भागातील लोकांची अवहेलना केल्यासंदर्भाचे दाखले आहेत. एवढेच नाही तर इतर वेळी ग्रामीण भागातील व्यक्ती शहरात गेला तर त्याला ग्रामीण, गावंढाळ व आडाणी म्हणून हिनवत होते. आज याच शहरी भागातील लोकांना ग्रामीण भागातील लोकांची आठवण झाली आहे. हे वास्तव आज कोणीही नाकारू शकत नाही. आज याच कारणावरून शहरी व ग्रामीण असा संघर्ष निर्माण होतांना दिसत आहे. परिस्थिती केव्हा कशी बदलेल याचा कोणी विचार करू शकत नाही. याच

मानवतेच्या नात्यातून विचार करणे आवश्यक आहे. ग्रामिण व शहरी संघर्ष टाळण्यासाठी ग्रामिण भागाच्या विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागामध्ये लघुउद्योगांची उभारणी केल्यास गरिब श्रीमंताची दरी कमी होण्यास मदत होईल यासाठी ग्रामीण विकासाला प्राधान्यक्रम दिल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळेल. शहराकडे लोकांचा असलेला ओढा कमी होईल. शहरातील गर्दी कमी करायची असेल तर ग्रामीण भागामध्ये उद्योगधंदे उभे करणे आवश्यक आहे.

आरोग्यव्यवस्थेवर पडणारा ताण:

भारतीय अर्थव्यवस्थेवर जो परिणाम झाला आहे. तसाच परिणाम भारतीय आरोग्य व्यवस्थेला सहन करावा लागत आहे. देशात आज कोरोना बाधितांची संख्या ३३०००च्या पुढे गेली आहे. तर मृतांची संख्या १०७० च्यावर गेली आहे. यामुळे देशातील आरोग्यव्यवस्था कोलमडली आहे. कोरोनाची चाचणीकणारे पाच लाख किट चीनकडून आयात केले आहेत. हया किट वाजवी किंमती पेक्षा अधिक दराने चीनने भारताला विकल्या आहेत. देशातील हॉस्पीटलची संख्या कमी असल्याने अनेक हॉटेलच्या माध्यमातून व इतर यंत्रणाच्या इमारती कोरोना पेशन्टच्या विलगीकरणासाठी शासनाने ताब्यात घेतल्या आहेत. या सर्वांना याचे भाडे भविष्यात दयावे लागणार आहे. तसेच व्हेन्टीलेटरची कमतरता, डॉक्टरांसाठी असणाऱ्या संरक्षण किटस्, डॉक्टरांचे प्रशिक्षण, डॉक्टरची संख्या, मास्कची व्यवस्था, औषधे याची कमतरता यामुळे देशाच्या आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण आलेला आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, अर्थसंकल्पीय तरतुदी पेक्षा कितीतरी पटीने हा खर्च फक्त कोरोना आजारावर झालेला आहे. याचा दूसरा परिणाम असा झाला आहे की, इतर आजार जसे की, डायबेटीज, हर्टचे पेशन्ट, दमा, टीबी इ. आजार असलेले पेशन्टकडे दूर्लक्ष झाल्याने या आजाराने मरणाऱ्या लोकांची संख्याही वाढलेली आहे. या लोकांकडे पाहण्यासाठी डॉक्टर नाहीत. ही एक चिंतेची बाब आहे. याचा ताण सर्व आरोग्य यंत्रणेवर होतांना दिसत आहे. आज हॉस्पीटलची संख्या वाढविण्यासाठी रेल्वेने आपल्या बोगींचे हॉस्पीटलमध्ये रूपांतर केले आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, रेल्वेला खूप मोठा खर्च सहन करावा लागत आहे. प्रवाशी रेल्वेचे रूपांतर हॉस्पीटलमध्ये करणे ही साधी गोष्ट नाही. यासाठी लागणारी आरोग्य विषयक यंत्रणा उभारणे सोपे नाही. हे अव्हाण भारतीय रेल्वेने पेलले आहे. यासाठी रेल्वेने, आर्थिक व कर्मचारी सुविधांची यंत्रणा सक्षम उभी केली आहे. कोरोना विषाणू आजाराच्या देखभाल व औषधोपचार, तपासणी यासाठी केंद्र शासनाने १५ हजार कोटी रूपयांची तरतूद केली आहे. ही तरतूद कमी असून त्याची संख्या आणखी वाढवावी लागणार आहे. हा आर्थिक बोजा एकटया आरोग्य व्यवस्थेवर होत असल्याने विकासाचे मुद्दे बाजूलाच राहिले आहेत.

भारताच्या आरोग्य व्यवस्थेचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की आजही आपल्याकडे पुरेशे डॉक्टर उपलब्ध नाहीत. ग्रामीण भागात आरोग्याच्या पुरेशा सोईसुविधांचा अभाव आहे. ग्रामीण भागातील डॉक्टरची संख्या कमी आहे. नव्हे प्रत्येक गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रे ही नर्सच्या माध्यमातून चालतात, याठिकाणी फक्त प्राथमिक आजारावरील गोळया मिळतात. प्रसूतीचा प्रश्न तसेच हिवाळयात व पाऊसळयामध्ये साथ रोगांचा प्रश्न मोठया प्रमाणावर ग्रामीण भागातील लोकांना सहन करावा लागतो. हा प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने शासनाने काय व्यवस्था केली आहे. हा प्रश्न अनुत्तरीत आहे. आजही ग्रामीण भागातील महिलांच्या प्रसूतीची सोय नाही. शहरापर्यंत घेऊन जाई पर्यंत एखादया महिलेला आपला जीव गमवावा लागतो आहे किंवा एखादया नवजात बालकाला आपला जीव गमवावा लागत आहे. याचा आजवर कोणीच विचार केलेला नाही. ग्रामीण भागात कमीत कमी एका गावासाठी एक एमबीबीस डॉक्टरची गरज आहे तालुक्यात शासकीय यंत्रणेकडे एक किंवा दोन एमबीबीएस डॉक्टर आहेत. एवढेच नव्हेतर तालुका स्तरावरील शासनाच्या हॉस्पीटलमध्ये पुरेशा साधन

सुविधाही उपलब्ध नाहीत ही चिंताजनक बाब आहे. खेडे गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रात तर ड्रेसिंगची पटटी वेळेवर मिळत नाही. ही मोठी शोकांतीका आहे. देशाला स्वातंत्र्य मिळूण ७१ वर्ष होऊ गेली तरीही आपण देशातील नागरीकांसाठी प्रभावी आरोग्य यंत्रणा उभी करू शकलो नाहीत. आज कोरोना विषाणूजन्य आजाराचा फैलाव जर ग्रामीण भागात झाला तर काय अवस्था होईल याची कल्पना न केलेली बरी आणि भारतीय आरोग्य व्यवस्था हे आव्हान कसे पेलवू शकेल याची कल्पनाही न केलेली बरी. ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी शासनाने याला प्राधान्यक्रम देणे गरजेचे आहे. हे एक शासना समोरील आव्हान आहे.

अन्नधान्याचा प्रश्न:

कोरोना विषाणूचा परिणाम असा झाला आहे की, आज अन्नधान्याची आयात निर्यात बंद असल्याने अनेक अडचणींणा सामोरे जावे लागत आहे. शेती व ततसम अन्न धान्य निर्मीती करणारी यंत्रणा बंद असल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. शेतीची मशागत करण्यासाठी मजूर वर्ग मिळत नाही. तसेच शेतीच्या मशागतीसाठी यंत्रही मिळत नाही. पेट्रोल व डिझेल मिळत नाही. शेतीशी संबंधित यंत्रे दूरूस्तीसाठीची दूकाने बंद आहेत. या व अशा अनेक कारणाने उत्पादन बंद झाले आहे, नव्हे यातच अवकाळी पाऊसामुळे शेतीमालाचे खूप मोठे नुकसान झाले आहे. भारतात अन्यधान्याची कमतरता येणाऱ्या काळात भासू शकते. देशात बसून खाणाऱ्या लोकांची संख्या वाढल्याने अन्न धान्याची मागणीही वाढली आहे. शासनाकडे जो अन्न धान्याचासाठा आहे तो शासनाच्या म्हणण्यानुसार दोन वर्ष पुरेल एवढा आहे. हे कितपत सत्य आहे हे वर्तमानपत्र व काही जाणकार लोकाच्या बोलण्यातून प्राप्त माहिती वरून लक्षात येते. संबंधित अभ्यासकांनी व शासनाने केलेल्या वक्तव्यामध्ये कोठेतरी तफावत जाणवते त्यामुळे येणाऱ्या काळात जर कोरोना आजारावर नियंत्रण ठेवले नाहीतर देशात अन्नधान्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. जागतीक स्तरावरही या विषाणूने आपले पाय पसरले असल्याने आयात व निर्यात बंद आहे. भारत देशासारखीच नव्हे त्यापेक्षा अधिक वाईट परिस्थिती जगातील इतर देशांचीहीझाली आहे. त्यामुळे अन्नधान्य आयात करणे ही सोपी गोष्ट नाही नव्हे ते शक्य ही नाही. या सर्व गोष्टीवर एकच उपाय म्हणजे कोरोनावर नियंत्रण ठेऊन अर्थव्यवस्थेला सक्षमकरणे व अन्नधान्याच्या अधिक उत्पन्नसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे व त्यासाठी आवश्यक सोई सुविधा पुरवणे गरजेचे आहे. आज कोरोना आजारामुळे बहुतांश कामगार वेगवेगळया राज्यात अडकले आहेत. ना हातला काम ना स्वत:च्या घरी, अनोळखी ठिकाणी बंदीस्त जीवन जागावे लागत आहे. पोटभरण्यासाठी आवश्यक अन्नधान्यही मिळत नाही. शासनाने अनेक अपत्कालिन सुविधा पुरवण्याचा प्रयत्न केला आहे परंतू त्यासेवा मजूरापर्यंत पोहचतही नाहीत. उपाशी पोटी जीवन जगण्याची वेळ या मजूरावर आली आहे या गोष्टीचाविचार केंद्रशासन व राज्यशासन यांना करावा लागणार आहे.

शिक्षणव्यवस्थे समोरिल आव्हान:

कोरोना विषाणूचा भारतातील आर्थिक, औद्योगिक, आरोग्य या क्षेत्रावरच नव्हे तर संपूर्ण समाज व्यवस्थेवर याचा परिणाम झाला आहे. देशातील शिक्षण संस्थावरही याचा खूप मोठा परिणाम झालेला आहे. ज्या ठिकाणी मुलांच्या आयुष्याचा टर्निंग पॉईट असतो त्या व्यवस्थेलाच याचा खूप मोठा हादरा बसलेला आहे. दहावी बोर्ड परीक्षेचे पेपर रद्द करण्याची वेळ शासनावर आली आहे. स्पर्धात्मक परीक्षाही पुढे ढकलण्याची वेळ आली. पहिली ते ११ वी पर्यंतच्या सर्वच परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. मुलांमध्ये आलेले नैराश्य, त्यांच्या आशा अपेक्षांवर याचा खूप मोठा परिणाम झाला आहे. मेडीकल, इंजिनिअर एन्ट्रान्स टेस्ट तसेच एमपीएससी, युपीएससी या परीक्षा पुढे ढकलण्याची वेळ आली आहे. बहुतांश परीक्षार्थीचे वय संपत आले आहे किंवा शेवटच्या टप्प्यात आहेत. त्यांच्या करिअरवर याचा खूप मोठा परीणाम झाला आहे. शिक्षण संस्था, विद्यापीठ, यांचे नियोजन विस्कळीत

झाले आहे. विद्यापीठ स्तरावरील परीक्षा घेता आल्या नाहीत. यामुळे शैक्षणिक सत्र पुढे ढकलण्याची शक्यता आहे. जी मुले शेवटच्या वर्षात शिक्षण घेत आहेत त्यांचे वय व पुढील शिक्षण यावरही या परिस्थितीचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. परीक्षा रद्द झाल्या किंवा परीक्षा होणार आहेत. या विचाराने विद्यार्थ्यांवर मानसिक ताण निर्माण झालेला आहे. आर्थीक, मानसिक, शारीरिक असा सर्वच प्रकारचा परिणाम संबंधित क्षेत्रात काम करणाऱ्या यंत्रणा व विद्यार्थ्यांवर होणार आहे.

आव्हानाला सामोरे जाण्यासाठी करावे लागणारे संभाव्य उपाय :

१. भारतीय अर्थव्यवस्था रूळावर आणण्यासाठी आरबीआयने रेपोदरात सुधारणा करणे गरजेचे आहे. एवढेच नव्हेतर उद्योगधंदयांना चालना देण्यासाठी ठोस निर्णय घेणे अपेक्षीत आहे.
२. लहान उद्योगांना सहा महिन्यासाठी जीएसटी सवलत दिल्यास परिणाम चांगले दिसून येतील.
३. सरकारने लहान उद्योजकांचे व्याज माफ करावे व कमी दराने कर्ज उपलब्ध करून दयावे.
४. खाजगी क्षेत्राच्या मदतीने जे सार्वजनिक प्रकल्पाचे काम सुरू आहे त्या प्रकल्पांची खोळंबलेली बीले सरकारने तातकाळ दयावीत, त्यामुळे या क्षेत्राच्या हातात पैसा राहिल अशी व्यवस्था करावी.
५. देणगी दाराकडून/इच्छूकांकडून आर्थिक मदत घ्यावी असे मदत करणारे अनेक घटक आहेत. त्यांची मदत घेऊन अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.
६. सद्या तेलाचे दर ३५ डॉलर प्रती बॅरल आहेत. ते दर किमान एक वर्षासाठी जरी कायम राहण्यासाठी शासनाने आखती देशा बरोबर चर्चा केली तर सरकारचे सुमारे ३ ते ४ लाख कोटी रूपये वाचू शकतात. या पैशाचा विकास कामासाठी विनियोग करता येईल. समजा देशातील पेट्रोलजन्य पदार्थाचे दर आहेतेच ठेवल्यास त्यातून मिळणारा महसूल थेट गरीब व कष्टकरी वर्गाच्या अकाउंटवर जमा करता येईल.
७. भारताची अर्थव्यवस्था आजही घरगुती उत्पादन व मागणीवर अवलंबून आहे आणि अशा अर्थव्यवस्था वेगाने पूर्वपदावर येत असतात. असे अर्थशास्त्र सांगते. तसेच तज्ज्ञांचे ही तेच मत आहे. घरगुती उत्पादन करणार वर्ग भारताकडे भरपूर आहे. यासाठी शासनाने या उद्योगांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.
८. सरकारने शेती व्यावसायाला चालना दयावी, त्यासाठी शेती मालवाहतूक, खरेदी–विक्री संदर्भाच्या प्रक्रियेला आधारभूत किंमतीचा विचार करून चालना दयावी.
९. कृषी आपत्ती योजनेसाठी शासनाने विशेष पॅकेज जाहिर करावे. जेव्हा शेतीचा माल बाजारात येईल तेव्हाच भारतीय उद्योगांना चालना मिळेल.
१०.पंतप्रधान किसान सन्मान योजने अंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणारे ६ हजार रूपये यात वाढ करून किमान २५ हजार रूपये करावी. रक्कम लाभार्थीच्या बॅंक खात्यात जमा करावी.
११.शेतकऱ्यांसाठीच्या बाजारसमीतीची रचना बदलून बाजार समित्यांचे विभाजन करून थेट ग्राहकापर्यंत शेतकऱ्यांचा माल पोहचविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.
१२.पीक पध्दतीची शेतकऱ्यांना माहिती दयावी बाजारातील मागणीनुसार उत्पादन घेण्यासाठी मंडळनिहाय मार्गदर्शन गट स्थापन करून शेतकऱ्यांचा माल मंडळामध्येच खरेदी करून लागलीच तो माल बाजारात जाईल याची व्यवस्था करावी.
१३.शेतकरी पीक योजनेचे स्वरूप बदलून आणेवारीची रचनाही बदलून ती पारदर्शक करावी गांवनिहाय आणेवारी विचारात घेण्यात

यावी कारण हवामानाचे स्वरूप बदलले असल्याने आणेवारी गांवनिहाय ठरविण्यात यावी.

१४.दारिद्रय रेषेखालिल लोकांची पुन:रचीत यादी तयार करून या लोकांना बेकारी भत्ता आपत्कालिन परिस्थितीत मंजूर करावा.

१५.खेडयातील सर्व स्थलांतरित कामगारांना अन्न, निवारा, आणि कपडयाची व्यवस्था करण्यासाठी प्रयत्न केले जावेत.

१६.राष्ट्रीय महामारीच्या काळातील शेतकऱ्यांचे ५० टक्के कर्ज माफ करून त्यांना मोफत बी बियाने वाटप करावे.

१७.शेतीसाठी कायम जलस्त्रोत निर्माण करावेत. अर्धवट राहिलेली कामे पूर्ण करण्याला पहिले प्राधान्य दयावे.

१८.शेतीमाला बरोबरच भाजीपाला व फळे यांचा किमान हमीभाव निश्चित करावा. नोकरदाराच्या महागाई भत्त्यांच्या पटीत शेतमालाचे ही भाव वाढवावेत.

१९.अमेरीकन कॉंग्रेसने २ ट्रिलियन डॉलर्सचे कोविड–१९ चे पॅकेज जारी केले आहे. त्या पैकी ९.५ अब्ज डॉलर्स कृषी आपत्ती निधिसाठी राखीव आहेत. भारताने कृषी आपत्ती निवारण पॅकेज अत्यल्प आहे. त्यामध्ये वाढ करावी व शेती उद्योगाला चालना देण्यासाठी प्रकिया उद्योग उभारणीसाठी कार्य करावे.

२०.देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी निर्यातक्षम उद्योगांना चालना दयावी. त्यासाठी लागणारा कच्चा माल भारतामध्येच कसा पिकेल आणि विकेल याची व्यवस्था करावी. त्यासाठी कच्चामाल निर्मात्यांना प्रोत्साहन दयावे.

२१. भारतीय औषध निर्माण संस्था या चांगले काम करत आहेत या संस्थांमध्ये नवनवीन संशोधन करण्यासाठी या कंपन्यांना व संस्थांना प्रोत्साहन दयावे संशोधनाला चालना दिल्याने बाहेर देशात भारतीय औषधांना जी मागणी आहे त्याचा पुरवठा आपणाला व्यवस्थीत करता येईल. यातून परकीय चलन भारताला मिळण्यास मदत होईल.

२२.स्त्रीयांवर आज नाही तर पूर्वी पासूनच अन्याय अत्याचार होत आहेत. स्त्रीयांना सक्षम बनवण्यासाठी त्यांना स्वयंपूर्ण बनवणे अत्यावश्यक आहे. त्यांना विविध प्रशिक्षणे देऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास व स्वावलंबी बनवण्याच्या दृष्टीने कार्य करावे.

२३.स्त्रीयांसाठी असणाऱ्या कायदयांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. यामध्ये दुजाभाव होणार नाही. याचा विचार करण्यात यावा. म्हणजे स्त्रीयांवर अन्याय अत्याचार होणार नाहीत.

२४.अन्न धान्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे तसेच शेतीविषयक व बदलत्या हवामानानुसार पीक पध्दती बदलने गरजेचे आहे. तेव्हाच उत्पन्नात वाढ होईल. सुधारित बी बीयाने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दयावे.

२५.भारतातील लोकांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी योग्य सोई सुविधा पुरविण्यात याव्यात आरोग्य विषयक समस्या सोडविण्यासाठी असणाऱ्या सोई सुविध आपणाकडे पुरेशा नाहीत त्या सुविधामध्ये वाढ करण्यात यावी. नवीन दवाखण्यांची निर्मिती करण्यात यावी. ४ ते ५ हजार लोकसंख्येच्या मागे कमीत कमी एका एमबीबीएस डॉक्टरची व्यवस्था करण्यात यावी.

२६.साथीच्या व संसर्ग जन्य आजारावर उपाय करता येतील यावर लक्ष केंद्रीत करावे. कारण भारतीय समाजव्यवस्था ही धार्मीक कल्पनेवर आधारीत असल्यामुळे व अंधश्रध्देचे प्रमाण जास्त असल्याने धार्मीक कार्यासाठी लोक मोठया प्रमाणात एकत्र येत आहेत. याचे प्रमाण जास्त असल्यामुळे साथीचे व संसर्गजन्य आजार या लोंकांमध्ये

तातकाळ पसरतात त्यामुळे आपत्कालिन व्यवस्था तयार करण्यापेक्षा आत्ताच त्या सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे.

२७.भारतीय समाजव्यवस्था बदलण्यावर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे समाननागरी कायदा केल्यास याचा असा परिणाम होईल सर्व कायदे सर्वांसाठी समान असतील त्यामुळे लोकसंख्या नियंत्रण व लोकांचे कल्याणकारी राज्य निर्माण होण्यास मदत होईल.

२८.शिक्षण पध्दतीमध्येही बदल होणे आवश्यक आहे. बदलत्या काळानूसार शिक्षण पध्दतीत बदल होणे गरजेचे आहे. कारण उत्पादनक्षम व कौशल्य विकासावर जास्त भर देणे गरजेचे आहे. संशोधन कार्याला तसेच नविनतम निर्मितीला चालना देणे गरजेचे आहे. वाढत्या लोकसंखेच्या गरजा पूर्ण करणारे शिक्षण पध्दती तयार करणे गरजेचे आहे.

२९.ऑनलाईन शिक्षण पध्दतीला चालना देणे आवश्यक आहे.चालना देतांना आर्थिक दृष्ट्या गोरगरिब कुटुंबातील मुलांसाठी इलेट्रॉनिक साधनांची उपलब्धता करून देणे गरजेचे आहे आज कोरोना रोगाच्या धर्तीवर करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सर्व शिक्षण संस्थाबंद आहेत. त्यामुळे ऑनलाईन शिक्षणाचा वापर मोठया प्रमाणावर करण्यात येत आहे. अशावेळी गरीब कुटुंबाकडे इलेट्रॉनिक साधने उपलब्ध नसल्याने ही मुले शिक्षणापासून वंचित राहतात. असे प्रकार होणार नाहीत यासाठी साधनांची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे.

३०.शहरी व ग्रामीण संघर्ष उद्‌भवणार नाही यासाठी ग्रामीण भागामध्ये उद्‌योगधंदयाची व्यवस्था करावी म्हणजे ग्रामीण भागातील लोकांचे शहराकडे होणारे स्थलांतर थांबेल. यामुळे शहरातील गर्दी कमी होण्यास मदत होईल.

देशात असो की, जगात कोणतीही आपत्कालिन परिस्थिती निर्माण झाली तरी अशा परिस्थितीला आपणास केव्हाही तोंड देता येईल अशी सक्षम यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. सक्षम व दिर्घ– कालिन उपाय केंद्र व राज्य शासनाने केले तर आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. त्यासाठी संबंधित यंत्रणांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कोराना विषाणूचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर खूप मोठा परिणाम झाला आहे. यामुळे देश आर्थिक व समाजिक दृष्टया तीन ते चार वर्ष मागे जाण्याची शक्यता आहे. आज जी परिस्थिती आहे त्या परिस्थितीत जर आपण या आजारावर नियंत्रण प्रस्थापीत करू शकलो तर भारताचे भविष्य उज्वल आहे. यात आपयशी ठरलो तर मानसाच्या असन्याचा शोध आपणाला घेत बसावा लागेल.

संदर्भ :


१. वार्ताहर, (१० एप्रिल २०२०),चिंताजनक– कोरेनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर दीर्घकालीन परिणाम, आरबीआयचा अहवाल,दै. ई–सकाळ,

२. वार्ताहार, (१३ एप्रिल २०२०),कोरोनाचा उद्योग धंदयानवर होणारा परिणाम, दै. ई.सकाळ,

३. www.misalpav.com - भारताची आर्थीक परिस्थिती ढासळत आहे काय

४. www.bbc.com-

५. www.bbc.com, (१३मार्च२०२),कोरोना वा. सें भारत की आर्थीक परेशानियॉं कितनीबढी.

६. https://m.jagran.com,(०७ एप्रिल २०२०)भाव में रिकॉर्ड तेजी और लॉकडाउन के कारण Gold Imports मे जबरदस्त गिरावट.

७. www.sakalmoney.com (०७ एप्रिल २०२०) देशातील ४० कोटी असंघटीत कामगार होणार अधिक गरीब: आयएलओ